

# शेवगा लागवड

**शेवगा लागवडी संबधी:**

शेवगा लागवडीसाठी जुन-जुलै महिन्यामधील पहिल्या पावसानंतरचा काळ अनुकूल असतो कारण, या वेळी हवेतील आर्द्रता वाढते. जेणेकरून उन्हाची तीव्रता देखील कमी असते. अशा वेळी रोपांची लागवड केल्यास रोपे उगवण्यास अनुकूल वेळ असते.

शेवगा लागवड करण्यासाठी पाऊस पडण्याच्या अगोदर दोन फुट लांब, रुंद आणि खोल खड्डे खोदावेत व रोपे लावावीत. शेवग्याची रोपे जर बियांपासून अभिवृद्धी केलेले असतील तर मातृवृक्षातील अनुवांशिक गुण (True to Type) झाडे मिळत नाहीत तसेच फळ धारणा देखील शाखीय पद्धतीने केलेल्या अभिवृद्धीपेक्षा 3-4 महिना उशीरा होते.

शाखीय पद्धतीने म्हणजे फाटे कलम वापरून अभिवृद्धी केल्यास झाडाला शेंगा लवकर लागतात. कटिंग्स (फाटेकलम) लागवड करण्यासाठी पेन्सील आकाराच्या जाडीची तसेच 1-15 मी. लांबची फांदी/काडी वापरावी.

**शेवगा लागवड**

बियाण्यांची खरेदी केल्यानंतर पॉलिथीन बॅगमध्ये शेवग्याची रोपे तयार करावी - पॉलिथीन बॅगची साईज ही ६ x ९ इंच असावी कारण, ह्या साईजच्या बॅगमध्ये शेवग्याची रोपे दीड महिन्यापर्यंत चांगली राहू शकतात. एकदा बॅगेची निवड झाल्यानंतर त्या बॅगेमध्ये माती आणि शेणखत भरावे. (मातीचे आणि शेणखताचे प्रमाण अनुक्रमे चारास एक (४:१) याप्रमाणे असावे म्हणजे दुसऱ्या शब्दात ४ गाड्या मातीमध्ये एक गाडी शेणखत घालावे, ते चांगले मिक्स करावे त्यामध्ये खडे जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. जेवढी लागवड करायची आहे तेवढ्या पॉलिथीन बॅग एक इंच रिकाम्या ठेवून भरणे झाल्यानंतर त्या जमिनीवर व्यवस्थित सरळ बसवाव्यात/लावाव्यात. बॅग अश्या पद्धतीने एका रेषेत लावा जेणेकरून बियांची लागवड करतांना बियाण्यांची लागवड करणाऱ्या माणसाचे हात सहज सगळ्या बॅगेपर्यंत पोहोचतील. आजच्या परिस्थितीत (एप्रिल आणि मे मध्ये लागवड करायची असल्यास) पॉलिथीन बॅगच्या वरच्या बाजूला सावलीसाठी मांडव घालणे गरजेचे आहे.

बियाण्यांची लागवड करण्याच्या एक दिवस अगोदर सर्व पॉलिथीनच्या भरलेल्या बॅग पाण्याने भिजवून घ्या व त्याच रात्री शेवग्याचे बियाणे एक तास भिजत ठेवा.(एका तासापेक्षा जास्त वेळ बिया पाण्यात ठेवू नये त्या खराब होतील) व नंतर बियाणे (बिया) पाण्यातून काढून घेऊन ओल्या कॉटनच्या कापडामध्ये रात्रभर झाकून ठेवा म्हणजे मग दुसऱ्या दिवशी हे बियाणे लागवडीसाठी वापरता येते. हेच बियाणे पॉलिथीनच्या बॅगमध्ये लागवड करतांना बॅगच्या बरोबर मध्यभागी (सेंटरमध्ये) एक इंच खोलीचे (काडीने होच मारून) छिद्र पाडणे व त्यामध्ये शेवग्याचे भिजवलेले बियाणे टाकणे व त्यावर एक इंच किंवा त्यापेक्षा कमी माती टाकणे व लगेच टाकलेली माती भिजेल एवढे पाणी टाकणे व अश्याप्रकारे सगळी लागवड करून झाल्यावर दररोज सर्व पिशव्यांना (पॉलिथीन बॅगला) झारीने पाणी देणे. पाणी अशारितीने द्यावे की जेणेकरून त्या पॉलिथीन बॅगमध्ये पाणी साचणार नाही व पॉलीथीनच्या बॅगमधील माती कोरडीही राहणार नाही. पाच त सहा दिवसानंतर हळूहळू रोपे दिसावयास सुरुवात होते. साधारणतः दहा ते अकरा दिवसांपर्यंत सर्व रोपे उगवून येतात.

यानंतर नेहेमी झारीने पॉलिथीन बॅगमधील रोपांना पाणी घालणे. पाणी घालतांना बॅगमध्ये पाणी साचणार नाही ह्याची काळजी घ्यावी. जर एखादया पिशवीमध्ये पाणी साचत असल्यास त्या पॉलिथीन बॅगला काडीने छिद्र पाडावे जेणेकरून त्यातील पाणी बाहेर येईल व बॅगमधील रोपे पाण्याने सडणार नाहीत. अशा रीतीने शेवग्याची रोपे तयार होतात. सर्वसाधारणतः एका महिन्यामध्ये सर्व रोपे जमिनीमध्ये लावण्यायोग्य होतात, तयार झालेली रोपे, बिया लावल्यापासून जास्तीत जास्त दीड ते पावणेदोन महिन्याच्या आतच जमिनीमध्ये लावावीत म्हणजे त्या पॉलिथीन बॅगमधील रोपांना त्रास होणार नाही. त्यांना दुखापत होणार नाही, सर्वसाधारण रोपे जमिनीत चांगली लावली जातील असे वाटत असल्यास ते दीड महिन्याच्या आतच जमिनीत लावावी.

तयार झालेली रोपे जमिनीत लावतांना पिशवीच्या डबल आकाराचा खड्डा घ्यावा. पॉलिथीन बॅगचे पॉलिथीन (प्लास्टिक) काढून घयावे, ते काढतांना रोपांना इजा होणार नाही ह्याची काळजी घ्यावी. बॅगमधील मातीचा गोळा फुटणार नाही यासाठी बॅगचे प्लास्टिक ब्लेडने कापावे म्हणजे प्लास्टिकही लवकर निघेल आणि त्यामधील रोपे असलेला मातीचा गोळा फुटणार नाही, आणि रोपांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही. रोपे असलेला बॅगमधील मातीचा गोळा जमिनीत ठेवतांना त्याच्यात शेणखत व माती टाकावी व तसेच शक्य असल्यास एक चिमूटभर थायमेट वापरावे की ज्यामुळे झाडाला (रोपाला) उन्नी (मुळे खाणारी अळी) लागणार नाही. माती आणि शेणखताने चांगली रोपे असलेला मातीचा गोळा सर्व बाजूंनी दाबावा व नंतर एक बकेट पाणी टाकावे, अश्या रीतीने बॅगमध्ये तयार झालेली रोपे जमिनीमध्ये लावल्यानंतर त्या शेवग्याच्या झाडाच्या बुडापाशी गवत/तण होणार नाही ह्याची काळजी घ्यावी पावसाळ्यामध्ये साधारणतः पाणी देण्याची गरज पडत नाही पण, एका महिन्यापेक्षा जास्त दिवस पाऊस पडत नसल्यास व आपल्याला शक्य असल्यास पाणी देण्याची तरतूद करावी. याच कालावधीमध्ये जर पांढरे जाळे करून पाने खाणारी अळी आढळून आल्यास रोगर या जंतुनाशकाचा स्प्रे मारावा असा स्प्रे सर्वसाधारण महिन्यातून दोन वेळा मारावा. अशा रीतीने झाडांची वाढ चांगली होत राहते.

**शेंडा मारणे (टॉप कटींग):**

जमिनीमध्ये शेवग्याच्या रोपाची तीन फूट वाढ झाल्यावर वरचा अर्धाफुट शेंडा कात्रीने कापावा (शेंडा हाताने मोडू नये त्यामुळे झाडाला इजा होऊ शकते) यानंतर झाडाची वाढ होत राहील. साडेचार ते पाच फूट झाडे झाल्यावर पुन्हा एकदा शेंडा मारणे आवश्यक आहे. जेवढे फुटवे (फांद्या) असतील तेवढे फुटवे कात्रीने कापावेत. पहिल्या पिकांकरिता यानंतर शेंडा मारण्याची गरज नाही.

शेवग्याची लागवड झाल्यापासून सहाच महिन्याने शेंगा यायला सुरुवात होते. शेंगा यायला सुरुवात झाल्यानंतर पाण्याची सोय असेल तर बाराही महिने आपल्याला शेंगा मिळतील. संपूर्ण वरच्या पावसावर सुद्धा शेवगा येतो. काळजी करण्याचं काही कारण नाही.

**खत व्यस्थापन:**

शेवगा पीक वेगाने वाढणारे पीक आहे. म्हणून, पावसाच्या सुरुवातीला किंवा पावसाळ्यात प्रत्येक झाडाला 10 कि. कंपोस्ट/शेणखत, 75 ग्रॅम नत्र (165 ग्रॅम युरिया) 50 ग्रॅम स्फुरद (108 ग्रॅम डी.ए.पी.) व 75 ग्रॅम पालाश (120 ग्रॅम एम.ओ.पी.) द्यावे.

**शेवगा लागवडीसाठी विविध वाण:**

शेवगा लागवडीसाठी कोईम्बतूर-1, कोईम्बतूर-2, पी.के एम-1 तसेच पी.के.एम-2 तसेच भाग्या, कोकण रुचिरा या जातीची निवड करावी.

**काढणी व उत्पादन:**

शेवग्याची लागवड केल्यापासून 6 महिन्यानंतर शेंगा लागतात. शेवगा शेंग रसरशीत असतानाच तोडणी करावी खूप टणक झाल्यास शेंगाची चव कमी होते. प्रत्येकी झाडापासून वर्षाला 50 किलो पर्यंत शेंगा मिळतात.

